शुक्रवार, ३ मे २०१९ MY सांगली पुढारी ३

# नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयास नॅकचे 'ब' मानांकन

**इस्लामपूर : शहर वार्ताहर**

पेठ (ता. वाळवा) येथील व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेच्या नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयास नॅकचे 'ब' मूल्यांकन मिळाले. बेंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेच्या समितीने महाविद्यालयाला भेट दिली होती.

समितीने दिलेल्या भेटीदरम्यान महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम, भौतिक सुविधा, नवीन उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती, प्रशासकीय बाबी, विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद आदी गोष्टींची पाहणी करण्यात आली.

अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन सुधारित नियमावलीनुसार एकूण ४ पैकी २.४६ गुणांचे मूल्यांकन मिळाले आहे. यामुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

नॅक समितीचे प्रमुख हारकोर्ट बटलर विद्यापीठ, कानपूरचे अधिष्ठाता प्रा. यदुरवीर सिंग, व्हीआयटी चेन्नईच्या अधिष्ठाता श्रीमती व्ही. वैदेही, वायएमसीएयुएसटी विद्यापीठ फरिदाबादचे अधिष्ठाता प्रा. संदीप ग्रोवर यांचा समावेश होता.

संस्थेचे सचिव राहुल महाडिक, कार्यकारी संचालक महेश जोशी, प्राचार्य डॉ. जे ए. तांबोळी यांनी समितीचे स्वागत केले. यावेळी समन्वयक प्रा. निलेश साने, प्रा. महेश पाटील, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.